Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 27-Oct-14 3:39:46 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय :- २९ ऑक्टोबर, २०१४ पासून सुरू होत असलेल्या परीक्षांबाबत..

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, २९ ऑक्टोबर-२०१४ पासून सुरू होणा-या विविध परीक्षांसाठी सर्व संबधित महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी कांही महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज जनरेट होत नाहीत या कारणास्तव विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज मॅन्युअली भरून विद्यापीठात जमा केलेले होते. या अर्जांवर कार्यवाही करताना असे निदर्शनास आले आहे की, कांही महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज जनरेट झालेले असूनही इनवर्ड न करता परस्पर विद्यापीठात जमा केलेले आहेत. हे योग्य नव्हे.

कांही विद्यार्थी जुन्या पॅटर्नचे आहेत, कांही ॲन्युअल टू सेमेस्टर अशा प्रकारातील आहेत. कांही ४०:१० पॅटर्नचे आहेत. या सर्वांचा निकालाचा डाटा संगणक केंद्राकडून डियुमध्ये घेण्यात आला आहे. अद्यापि कांही विद्यार्थ्यांचा असा डाटा घेण्याचे काम सुरू असून ज्यांच्या अर्जांवर प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्यांचे परीक्षा अर्ज जनरेट करून त्यांचे बैठक क्रमांक व हॉल तिकीट त्यांच्या आणि महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध झालेले आहेत. तथापि अद्यापि कांही विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, बैठक क्रमांक व हॉल तिकीट जनरेट करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना ऑड नंबर देऊन परीक्षेस बसू द्यावे लागणार आहे.

तरी महाविद्यालयांनी खालील बाबींची दक्षता घेऊन ऑड नंबर घ्यावेत व विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू द्यावे. संबंधित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र असल्याची खात्री करावी.

१. संबधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठात पाठविला असल्याची खात्री आपापल्या महाविद्यालयाच्या रेकॉर्डवरून करून घ्यावी. परीक्षा शुल्क भरणा केल्याची पावती असल्याची खात्री करावी.
२. संदर्भित विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक व हॉल तिकीट त्यांच्या आणि महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध नसल्याची खात्री करून नंतरच ऑड नंबर देण्याची कार्यवाही करावी. अन्यथा डबल नंबरींग होण्याची शक्यता आहे व त्या विद्यार्थ्याचा निकाल जाहीर करण्यात अडचणी येतील व त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय आणि विद्यार्थी यांचेवर राहील. तरी याबाबत काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
३. महाविद्यालयांनी मॅन्युअल अर्ज पाठविलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिनांक २८.१०.२०१४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व डियु पोर्टलवर ठेवण्यात येईल. त्या यादीतील पीआरएन नंबर घेऊन विद्यार्थी आपापले बैठक क्रमांक स्टुडंटस् प्रोफाईलला पाहू शकतील.
४. ऑड नंबर देताना महाविद्यालयांनी त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या रेंजमधीलच नंबर देण्याचा आहे. असे नंबर संबंधित परीक्षा विभागांनी महाविद्यालयांना द्यावयाचे असून त्याची नोंदही विहित नमुन्यात ठेवण्याची आहे. डबल नंबरींग दिले गेल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर राहील. महाविद्यालयांनी ऑड नंबर विद्यापीठातील संबंधित विभागाकडूनच घ्यावयाचे आहेत. परस्पर ऑड नंबर देण्यात येऊ नयेत.
५. अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षांचे गुण, प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण आणि अशा प्रकारचे लेखी परीक्षांखेरीजचे जे गुण असतील ते दिलेल्या ऑड नंबरवरच फिड करावे लागणार आहेत. सबब ते महाविद्यालयांच्या लेटर हेडवर प्राचार्य आणि संबंधित विभागप्रमुख यांच्या सहीने पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा असे गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.
६. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रमाद समितीने विषयांस/संपूर्ण परीक्षेस बसण्यासाठी प्रतिबंधित केलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्जही महाविद्यालयांनी मॅन्युअली भरून पाठविल्याचे निदर्शनास आले आहे. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबाबत कोणतीही प्रक्रिया करण्यात आलेली नाही. जे विद्यार्थी कांही कालावधीसाठी प्रतिबंधित आहेत त्यांचे परीक्षा अर्ज जनरेट केले जाणार नाहीत, त्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू देण्याबाबतची कार्यवाही खातरजमा करूनच करावी. याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत :- सर्व परीक्षा विभागप्रमुख व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव

F:\ \navin file COE MK Tarankint question.doc/mahadeshwar/